पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ७३६/२०१३
दिनांक : ०८ / ०८ / २०१३

प्रति,

मा........................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची सभा दिनांक **१६/०८/२०१३** रोजी आयोजित केलेबाबत ....

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१६/०८/२०१३** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.
मा.विधी समिती सभा
**कार्यपत्रिका क्रमांक ६**

दिनांक : **१६/०८/२०१३** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१६/०८/२०१३** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**दिनांक ०२/०८/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.५) सभावृत्तांत कायम करणे.**

**----------**

**विषय क्र.१)** डॉ. के.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक १६/०८/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.२)** श्री. सतिश कुलकर्णी, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/०७/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक १६/०८/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.३)** श्री. ज्ञानेश्वर ढेरे, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २३/०९/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक १६/०८/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.४)** मुंबई पुणे रस्त्यावर दापोडी ते पिंपरी चौक कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ.देखभाल दुरुस्ती करणे या उपलेखाशिर्षाखाली दापोडी ते निगडी मार्गदर्शक फलक बसविणे व दुरुस्ती करणेकामीचे र.रु.४०,००,०००/-( अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त ) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक १६/०८/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.५)** औंधरावेत बी.आर.टी.एस. रस्त्यावरील वाय जंक्शन येथे अंडरपास बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.१३,४२,२१,६९०/- च्या अंदापजपत्रकीय खर्चास मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक १६/०८/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.६)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल/कॅन्टींन व अन्य खाद्यपदार्थ उत्पादन/विक्री करणा-या व्यवसायांना त्यांचे व्यवसायातून दैनंदिन निर्माण होणारे फुडवेस्ट गोळा करणे व वाहतूक करुन कचरा डेपो येथे विल्हेवाट लावणे कामासाठी सध्या आकारणेत येणा-या शुल्कामध्ये परिशिष्ट “अ” मध्ये नमुद केलेप्रमाणे हॉटेल/कॅन्टीन वेस्ट गोळा करणे सेवेसाठी आकारणेत येणा-या शुल्कामध्ये वाढ करणे तसेच मंगल कार्यालये, मॉल, स्वीट मार्ट, हॉल, सभागृह, बेकरी व्यवसायांना प्रपत्र “ब” प्रमाणे वाढ करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**परिशिष्ट “ अ ”**

| अ.क्र. | हॉटेलचा दर्जा | हॉटेलची संख्या | सध्याचे सेवाशुल्क (वार्षिक) र.रु. | वाढ केल्यानुसार नविन सेवाशुल्क (वार्षिक दर) र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | “ अ ” | २०६ | ३,०००/- | ८,०००/- | १६,४८,०००/- |
| २ | “ ब ” | १३१ | २,०००/- | ६,०००/- | ७,८६,०००/- |
| ३ | “ क ” | ३८१ | १,०००/- | ४,०००/- | १५,२४,०००/- |
| ४ | “ ड” | ५३९ | ---- | ३,०००/- | १६,१७,०००/- |
| | एकूण | १२५७ | ---- | ---- | ५५,७५,०००/- |

**परिशिष्ट “ ब ”**

| अ.क्र. | दर्जा | संख्या | आकारावयाचे वार्षिक सेवाशुल्क र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मंगल कार्यालये | ४९ | १०,०००/- | ४,९०,०००/- |
| २ | शॉपिंग मॉल, मेगा मार्ट | ०२ | १५,०००/- | ३०,०००/- |
| ३ | फाईव्हस्टार, थ्रीस्टार रिसोर्टस् | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| ४ | हॉल | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| ५ | सभागृह | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| | एकूण | ६० | ----- | ६,१४,०००/- |

**विषय क्र.७)** पिंपरी चिंचवड मनपाच्या अ प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणे (सुधारित प्रशासकीय मान्यता) कामी र.रु.२२,५३,१८६/- (अक्षरी र.रु. बावीस लाख त्रेपन्न हजार एकशे शहाऐंशी फक्त ) चे खर्चाचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.८)** श्री. गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.९)** मुंबई पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ. देखभाल व दुरुस्ती करणेचे र.रु.३५,००,०००/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख फक्त ) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१०)** मुंबई पुणे रस्ता पिंपरी चौक ते भक्ती शक्ती निगडी कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ.देखभाल व दुरुस्ती करणेचे र.रु.४४,२७,९६९/- (अक्षरी र.रु. चव्वेचाळीस लाख सत्तावीस हजार नऊशे एकोणसत्तर फक्त ) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ७३६ /२०१३
दिनांक : ०८/०८/२०१३

**टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे ( डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.**